प्राचार्य डॉ. पांडुरंग निवृत्ती गायकवाड
सेवापूर्ती गौरवग्रंथ

# महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय




संपादक

डॉ. पांडुरंग भोसले
डॉ. सचिन रुपनर
प्रा. संग्राम गोसावी

प्राचार्य डॉ. पांडुरंग निवृत्ती गायकवाड सेवापूर्ती गौरवग्रंथ

# महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय


संपादक

डॉ. पांडुरंग भोसले

डॉ. सचिन रुपनर

प्रा. संग्राम गोसावी

प्रकाशक क्रमांक : २९०

Maharashtratil Bhakti Sampraday

**महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय**

**संपादक :** डॉ. पांडुरंग भोसले
डॉ. सचिन रुपनर
प्रा. संग्राम गोसावी

प्रकाशन – समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर.

प्रकाशक – श्री. प्रविण अनिलराव भाकरे,
शंकर-पार्वती निवास, ढोले गल्ली, रांझणी,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर – ४१३ ३०४
मो. ९६८९१४१२०१ / ८६०५५१२७४२

© प्राचार्य डॉ. पांडुरंग निवृत्ती गायकवाड
'हरिनामवेल', कृषी उत्पन्न बाजार समितीमागे,
मंचर, जि. पुणे – ४१० ५०३
मो. नं. ९७६७२२२७११

मुद्रण : एक्सेल प्रिंटींग प्रेस, पुणे

मुखपृष्ठ : संतोष घोंगडे

प्रथमावृत्ती : २८ मे, २०२२

**अक्षरजुळणी : समीक्षा टाईपसेटर्स, पंढरपूर**

ISBN : ९७८-९३-९४६२२-४७-०

**किंमत : ३५०/– रु.**

टीप : या पुस्तकातील लेखकांच्या लेखांमधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

समीक्षा पब्लिकेशनची सर्व पुस्तके bookganga.com या संकेतस्थळावर ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध आहेत.

# अनुक्रम

१. **संत मेळ्याच्या अभंगातील वैचारिक जाणिवा**
प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे / ११

२. **संत तुकारामांच्या साहित्यातील समाजविचार**
प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड / २१

३. **स्त्री संतांची परंपरा : एक भगवी पताका**
प्राचार्य डॉ. शिवाजी निवृत्ती मोहिते / २७

४. **संत जनाबाईंचे अभंग : स्त्री जीवनाचा उत्कट काव्यमय अविष्कार**
प्राचार्य डॉ. शोभा बाळासाहेब इंगवले / ३९

५. **आनंद संप्रदाय आणि माणदेशी परंपरा**
प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी / ४५

६. **वारकरी संप्रदाय व आद्यकीर्तनकार संत नामदेव**
प्राचार्य डॉ. भगवानसिंह राजपूत/ डॉ. सौ. मनिषा दयाघन पाटील / ५१

७. **भक्ती संप्रदायाचे स्वरूप, विशेष व वाटचाल**
डॉ. ज्योती परब / ५६

८. **भक्ती संप्रदायांचे सामाजिक योगदान**
डॉ. भामा नाईक-गोसावी / ६७

९. **महानुभावीय तत्त्वज्ञान आणि आचारधर्म**
डॉ. शीतल कोरडे / ७५

१०. **महानुभावीय गद्य वाङ्मय**
डॉ. अतुल नारायण चौरे / ८०

११. **महानुभावांचे पद्यवाङ्मयाचा परिचय**
डॉ. विक्रम जाधव / ८६

१२. **महाराष्ट्रातील मुस्लिम (सूफी) संप्रदाय**
डॉ. पांडुरंग भोसले / ९३

१३. **नागेश संप्रदाय**
डॉ. सचिन सि. रुपनर / १००

१४. महाराष्ट्रातील ख्रिस्ती संप्रदाय
डॉ. वर्षा देसाई - रुपनर /१०७

१५. दत्त संप्रदाय
डॉ. संदीप वाकडे / ११२

१६. वीरशैव संप्रदायाचे स्वरूप व वाङ्मयीन कार्य
प्रा. बाळू तिखे / ११७

१७. वारकरी संप्रदायाचे स्वरुप
सौ. प्रमिला मनोहर भालके /१२४

१८. संत ज्ञानेश्वरांचे वाङ्मयीन कार्य : एक शोध
प्रा. डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील /१३३

१९. संत नामदेव : 'तीर्थावळी'चे अभंग
प्रा. गोविंद मुंढे /१३८

२०. संत नामदेवांची विठ्ठलभक्ती
डॉ. पौर्णिमा कोल्हे / १४४

२१. संत चोखामेळा : उपेक्षित, अस्वस्थ जाणिवेचा अविष्कार
प्रा. ज्ञानेश्वर अशोक तिखे / १४९

२२. महाराष्ट्राचे महान संत : चोखामेळा
डॉ. चंद्रकांत कांबळे / १५५

२३. संत सोयराबाई ह्यांच्या काव्य आणि अभंगाचे मल्यमापन
डॉ. संदीप सांगळे /१६२

२४. वारकरी संप्रदायातील संत जनाबाईंची अभंगवाणी
डॉ. विकास बहुले /१७०

२५. संत एकनाथांच्या भारुडांमधील समाजदर्शन
डॉ. प्राजक्ता प्रल्हादराव निकम / १७९

२६. संत तुकाराम : व्यक्तित्व आणि कवित्व
डॉ. शहाजी पाटील / १८६

२७. सर्वश्रेष्ठ : संत तुकाराम
डॉ. संजयकुमार सरगडे / १९२

२८. संत तुकारामांच्या अभंगातील समाजचिंतन
प्रा. डॉ. रमेश पोळ /१९६

२९. संत तुकारामांच्या अभंगातील सामाजिक जाणिवा
डॉ. अमोल चांदेकर / २०१
३०. संत तुकारामांच्या अभंगातील विठ्ठल वर्णन व दृष्टांत
सौ. हर्षाली संदीप लोखंडे / २१२
३१. तुकाराम ते जगद्गुरु संत तुकाराम : एक दृष्टिक्षेप
डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात / २२०
३२. संत तुकारामांच्या अभंग वाङ्मयाचे विशेष
प्रा. डॉ. सौ. मंगल एकनाथ डोंगरे /२२८
३३. अक्षर पंढरीचा वारकरी संताजी जगनाडे महाराज
डॉ. रामचंद्र मोरेश्वर वासेकर /२३६
३४. संत कवयित्रींच्या वाङ्मयातील माणूसपणाचे भान
प्रा. डॉ. सायली योगेश आचार्य / २४०
३५. संत साहित्यातून होणारे सामाजिक प्रबोधन
डॉ. राजेंद्र खंदारे / २४९
३६. नैतिक मूल्यांची शिकवण देणारे संतसाहित्य
डॉ. बाबासाहेब शेंडगे /२५७
३७. वारकरी आभूषणे
प्रा. ज्ञानेश्वर भोसले / २६२
३८. स्वामी स्वरुपानंदांच्या 'स्वरूप पत्र मंजूषा' मधील नीतिबोध
डॉ. महेश सखाराम बावधनकर / २७२
३९. नाथ संप्रदायाचे स्वरूप आणि महाराष्ट्रातील परंपरा
प्रा. अमोल सुभाष कवडे / २८५
४०. समर्थ संप्रदायाचे साहित्य : स्वरूप आणि विशेष
प्रा. डॉ. रेश्मा रमेश दिवेकर / २९०
४१. समर्थ रामदास यांचे मनाचे श्लोक : एक आकलन
डॉ. पद्माकर दिगंबर वानखेडे / २९९
४२. समर्थ संप्रदायातील संत : वेणाबाई
डॉ. राजेंद्र सा. बावळे / ३०४
४३. महाराष्ट्रातील यादवकालीन भक्ती संप्रदाय
प्रा. संग्राम सीताराम गोसावी / ३०७

# ८. भक्ती संप्रदायांचे सामाजिक योगदान

**डॉ. सीमा नाईक–गोसावी**
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती (पुणे)

---

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायांनी समाजप्रबोधनाचे मौलिक असे कार्य मोठ्या प्रमाणात केले आहे. आज भारतात समाजसुधारणेच्या चळवळींचा विचार करता महाराष्ट्र अग्रेसर आहे हे लक्षात येते. नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय, समर्थ संप्रदाय वीरशैव आणि लिंगायत या सर्व संप्रदायांनी एका बाजूला समाजप्रबोधन केले आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाची जडणघडणही केली. मराठी संस्कृती आणि मराठी वाङ्मय यांचे भरण–पोषण केले. या सर्व संप्रदायातील संतांनी 'माणसाला 'माणूस' म्हणून प्रतिष्ठा मिळाली पाहिजे' हा विश्वव्यापी विचार मांडला. वैदिक कालापासून प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध विरोध, विद्रोह आणि बंड करणारे अनेक संत दिसतात. या संप्रदायांमुळे समाजातील जातीपातीच्या उच्चनीचतेचे प्रस्थ कमी झाले. अस्पृश्यतेची टोकं बोथट झालीत. प्राचार्य रा.तु.भगत आपल्या संत साहित्य आणि समाज प्रबोधन' या ग्रंथाच्या संपादकीयात म्हणतात, ''समाज १०० वर्षांनी एक [illegible] चालीरीतीत अत्यंत मंदपणे बदल घडत असतो. समाजमनात शेकडो वर्ष रुजलेल्या अनिष्ठ चालीरीती नष्ट करण्यासाठी समाजाला व्यापक स्वरूपात ज्ञान देण्याची गरज असते. यासाठी संतविचार दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात.''[१] एकूणच प्रस्तुत निबंधात महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायांनी कोणते सामाजिक योगदान दिले? या भक्ती संप्रदायाचे वेगळेपण काय यांचा प्रामुख्याने शोध घ्यायचा आहे.

नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय, समर्थ संप्रदाय या सर्व संप्रदायांमध्ये वारकरी संप्रदाय अतिशय सर्वत्र लोकप्रिय व आजही जनमानसात रुजलेला असा संप्रदाय आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, संत मंडळातील गोरा कुंभार, संत सेना न्हावी, सावता माळी, नरहरी सोनार अशा सर्व अठरापगड जाती जमातीतील संतांचा समावेश या पंथात आपल्याला दिसतो.

चंद्रभागेच्या तीरावर आणि पंढरीच्या वारीमध्ये समाजातील सर्व जाती जमातीतील भक्त एकत्र वावरताना आपल्याला दिसतात. ही किमया वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाने साधली समोरच्या माणसातच विठ्ठल आहे; परमेश्वर आहे अशी साधी आणि सोपी परमेश्वरप्राप्तीची रीत या संप्रदायाने रुजविली. त्या काळात अस्पृश्यता बाजूला ठेवून सर्वांनी असे एकत्र येणे हे एक फार मोठे दिव्य होते.

'संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' या आपल्या ग्रंथात प्रा. गं. बा. सरदार म्हणतात, ''ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्राला तत्त्वज्ञान दिले. नामदेवांनी भक्तीची पताका फडकाविली. एकनाथांनी तत्त्व आणि तपशील, विचार आणि आचार यांचा मिलाफ घडवून आणला. ज्ञानाशिवाय भक्तीला डोळसपणा नाही. आचाराशिवाय तिच्यातील जडता नाहीशी होत नाही. परंतु या तिन्ही प्रवृत्ती एकवटून त्यांची सामाजिक नीतिमत्तेत परिणती झाल्याशिवाय मानवी जीवनाला पूर्णता नाही. म्हणून तुकारामांनी आपल्या अभंगातून समाजकंटकांची यथोचित संभावना करून चिरंतन नीतिमूल्यांची जोपासना केली, आणि ज्ञानेश्वरप्रणीत भागवतधर्माच्या देवालयावर कळस चढविला.''[2]

प्रा. गं. बा. सरदार म्हणतात, ''सर्व वारकरी संतांनी अंधश्रद्धेवर वारंवार आघात केले आहेत; अज्ञान मूलक उपासनेचा निषेधच केला आहे. ज्ञानाची मक्तेदारी एका विशिष्ट वर्गाकडे न राहता सगळ्या समाजाला त्याचा फायदा मिळावा म्हणून ज्ञानेश्वरांनी वेदांताची गहन तत्त्वे सामान्य जनांच्या भाषेत सांगितली.''[3]

तुकारामांनी धर्मभोळेपणा व अंधश्रद्धा आंवर आपल्याअभंगांतून प्रहार केले. ज्या काळात पुरोहितशाही सामान्य जनतेचे शोषण करीत होती, त्याकाळात तुकारामांनी तीर्थयात्रा, व्रतवैकल्य, अंगारे धुपारे, नवससायास यांच्यावर वैचारिक हल्ले केले. तुकाराम हे एक जाणते समाजसुधारक होते. देवळातल्या देवापेक्षा माणसातला देव जागविण्याचा आणि लोकांना दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न ही त्यांच्या सामाजिक जाणिवेची प्रमुख खूण आहे. तुकाराम म्हणतात,

''देव आहे अंतर्यामी । व्यर्थ हिंडे तीर्थगामी ।'' तुकाराम समाजप्रबोधनाचे प्रकाशस्तंभ होते. एकूणच वारकरी संप्रदायाने समाजात सामाजिक समता आणली नसेल ती त्यांची मर्यादा होती पण भीवरेच्या तीरावर धार्मिक समता आणण्याचे फार मोठे कार्य वारकरी संप्रदायाने केले यात शंकाच नाही. संत चोखामेळा, संत सोयराबाई, संत कर्ममेळा, कान्होपात्रा यांसारख्या अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या संतांनी आपल्या अभंगातून आणि कृतीतून जातीव्यवस्थेवर जे कोरडे ओढले आहेत; प्रहार केले आहेत असा – जाती तोडण्याचा– जाती मोडण्याचा जो प्रयत्न या संतांनी केला त्यास तोड नाही.

एकूणच जातीव्यवस्थेला छेद देण्याबरोबरच स्त्रियांना भक्तिमार्गात सामावून घेण्याचे महान कार्य या संप्रदायाने केले. पुढील काळासाठी ही स्त्री–पुरुष समतेची नांदीच ठरली. आज ८००-९०० वर्षांनंतरही वारकरी संप्रदायाची लोकप्रियता टिकून आहे. या संप्रदायातील संतांनी केलेले कार्य ऐतिहासिक तर आहेच परंतु समाजपरिवर्तनाला गती देण्याचे किती मोठे कार्य या संप्रदायाने केले याची जाणीव होते. संत तुकाराम आणि इतर संतांनी अंध रूढी, अंधश्रद्धा, लोकभ्रम, खोटी प्रतिष्ठा, दांभिकता यावर आपल्या अभंगातून केलेले आघात आणि प्रहार केवळ वाचण्यासारखेच आहेत. आज २१ व्या शतकातही– विज्ञानयुगातही अशा अभंग वाङ्मयाची किती मोठी गरज आणि स्थान आहे, हे लक्षात येते. या संतांचा एखादा तरी फुटका–तुटका अभंग मराठी माणसाला येत नाही असे क्वचितच पाहावयास मिळेल.

सारांश – वारकरी संप्रदायाचे वेगळेपण त्याच्या साधेपणातच दडले आहे. मानवतावादाचा इतका जाहीर अजेंडा इतर कुण्या चळवळीने वा संप्रदायाने उचललेला दिसत नाही.

भक्ती संप्रदायाच्या सामाजिक योगदानाचा विचार करता महानुभाव संप्रदायाचे कार्य व स्थान महत्त्वाचे आहे. महानुभाव संप्रदायाने १३ व्या शतकात स्त्रियांना धार्मिक कार्यात मुभा, दिली होती. भक्तीमार्ग खुला केला होता. महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्रीचक्रधरस्वामी यांचा अस्पृश्यतेला विरोध होता. सर्वसामान्यांपर्यंत ते पोहचत असत. परोपकारी. समतामूलक अशी त्यांची वर्तणूक होती. 'लीळाचरित्र', एकांक, पूर्वार्ध व उत्तरार्धातून आपल्याला सर्वसमावेशक व मानवतावादी चक्रधरांच्या व्यक्तित्वाची कल्पना येते. लीळाचरित्र हे मराठीतील आद्यचरित्र होय. श्रीगोविंद [illegible] ग्रंथलेखन केले. मराठी साहित्याला देखील महानुभाव वाङ्मयाने समृद्ध केले आहे. महदंबेचे धवळे हे मराठीतील आद्यकाव्य होय. एकूणच महानुभाव संप्रदायाचे विपुल वाङ्मय हा प्राचीन मराठी साहित्याचा मोठा ठेवा होय. तेराव्या शतकातील मराठी भाषा आणि साहित्याचा अभ्यास करताना या वाङ्मयाची आपल्याला मोठी मदत होते महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान व आचारधर्म, अध्यात्मिक व सामाजिक बाबतीत परोगामी आहे. ''चक्रधर सनातनपंथी, पुराणमतवादी, पढिक पंडीत नव्हते, तर ते बुद्धी प्रामाण्यवादी थोर विचारवंत होते. चक्रधरांची बुद्धीनिष्ठा त्यांनी अनेक प्रसंगी अंधश्रद्धा व कर्मकांडास जो विरोध दर्शवला आहे त्यावरून दिसून येते''[४] असे डॉ. जे. बी. शिंदे यांनी म्हटले आहे.

समर्थ रामदासस्वामींनी प्रामुख्याने पारमार्थिक हेतूने समर्थ संप्रदायाची उभारणी

केलेली दिसून येते. 'मुख्य हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण।।' असे त्यांच्या कार्याचे सूत्र होते. ''दुःखी, दीन, दुर्बल, निष्क्रीय, दैववादी, आचार विचार, भ्रष्ट, निःसत्त्व, अविवेकी समाजामध्ये न्याय, नीती, निष्ठा प्रस्थापित करणे हे तर समर्थांचे ध्येयच होते.''[५] असे उद्गार समर्थ रामदासांच्या समग्र साहित्याचे चोखंदळ अभ्यासक प्रा. प्रभाकर पुजारी यांनी काढले आहेत.

समर्थांचे कार्य आणि विचार समाजजीवनाच्या सर्व अंगांना व्यापणारे आहे. रामदास प्रयत्नवादाचे, बलोपासनेचे व सद्गुणांचे पुरस्कर्ते होते. समर्थ संप्रदाय आजही महाराष्ट्रात काही प्रमाणात दिसतो. समर्थांचा 'दासबोध' आणि 'मनाचे श्लोक' ग्रंथ लोकप्रिय आहेत. रामदासांच्या वाङ्मयाची पारायणे घरोघरी होतात. समर्थ संप्रदायाने मराठी वाङ्मयात मोठी भर घातली आहे.

भक्ती संप्रदायाच्या कार्याचा विचार करता नाथ संप्रदायाचे कार्य, सामाजिक योगदान तेवढेच महत्त्वाचे आहे. नाथ संप्रदायाचा इतर संप्रदायावरही प्रभाव पडलेला दिसतो. ''ज्ञानेश्वर, नामदेव या दोघांच्याही भावविश्वावर नाथ संप्रदायाचा प्रभाव असणे अगदी स्वाभाविक आहे''[६] असे र. रा. गोसावी यांनी म्हटले आहे. मध्ययुगीन महाराष्ट्रीय धर्मसाधनाही नाथ संप्रदायाची आचारविचारांनी आणि गोरक्षनाथांच्या अलौकिक व्यक्तित्वाने भारावलेली होती. नाथसंप्रदाय ही मध्ययुगीन धर्म साधनेची गंगोत्री होती.

नाथ संप्रदायाला पुढे अवनती लागली. नाथ संप्रदायाचा प्रभाव पुढे कमी होण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे त्याने योगमार्गावर दिलेला अवास्तव भर होय. सर्व समाजाला हा मार्ग अवलंबिणे शक्य नव्हते. भक्ती मार्गाकडे सर्वसामान्य लोक आकृष्ट होऊ लागले. अशा प्रकारे नाथ संप्रदाय भक्तीमार्गात विलीन झाला.

दत्त संप्रदाय हा सगुणोपासक आणि गुरुभक्तीप्रधान आहे. त्यामुळे दत्तात्रेयांच्या सगुण साक्षात्कारासाठी दत्तोपासक कठोर अनुष्ठानाचे आचरण करतात. हा संप्रदाय खऱ्या अर्थाने गुरुसंप्रदायच आहे. मात्र इतर संप्रदायांप्रमाणे यात गुरुशिष्यपरंपरा निर्माण होऊ शकली नाही.

महाराष्ट्राला फार मोठी संतपरंपरा आहे. महात्मा बसवेश्वरांपासून लोकसंत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यापर्यंत प्रबोधनाची एक परंपरा विकसित झालेली दिसते. संत कबीर आपल्या अभंगात म्हणतात,

''जत्रा में फत्रा बिठाया
तीरथ बनाया पानी
दुनिया भै दिवानी

**पैसे की धुलधानी''**

कर्मकांडांवर सर्वच संतांनी कोरडे ओढले आहेत. मूल होण्यासाठी बुवा बाबाकडे खेटा घालणाऱ्या, नवस- सायास करणाऱ्या लोकांना उद्देशून संत तुकाराम एका अभंगात म्हणतात,

**''नवसे सायासे जर कन्या-पुत्रे होती**
**तर रांडेला का करणे लगे पती''**

गाडगेबाबांची कीर्तनेतर प्रबोधनाचा जागर होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता आज सर्वांनी आचरणात आणण्याची गरज आहे.

भक्ती संप्रदायातील कर्मकांड, अंधश्रद्धा यांची चिकित्सा होणे गरजेचे आहे. या संप्रदायांनी समाजाची विवेकशक्ती जागृत ठेवण्याचे मौलिक कार्य केले. माणसातच परमेश्वर आहे अशी शिकवण दिली. देवाकडे जाण्यासाठी मध्यस्थाची दलालाची गरज नाही, असे निक्षून सांगितले. आजही या भक्ती संप्रदायाचा कमी-अधिक प्रभाव आपल्या समाजावर दिसतो. या संप्रदायात काही उणिवा असतीलही परंतु काळानुरूप प्रबोधनाची एक जागती परंपरा या संप्रदायांनी निर्माण केली एवढे मात्र खरे !

संदर्भग्रंथ:

१. भगत, रा. तु.(संपा.), 'संत साहित्य आणि समाजप्रबोधन', दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., पुणे, १५ सप्टें. २००५, पृ.५.
२. सरदार, गं.बा., 'संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती', महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, द्वितीय आवृत्ती, फेब्रु. १९६२, पृ. १२३-१२४.
३. तत्रैव (२)
४. भगत, रा. तु.(संपा.), उनि., पृ. ३३.
५. तत्रैव, पृ.८७.

□□□